नोंदणी क्र. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
संपादक : कमलाकर सोनकांबळे
YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे | Year - 3rd
अंक - ३३८ | Issue - 338
वार गुरुवार दि. ३० एप्रिल २०२६ | Blow- Thursday Date 30 April 2026
ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com
वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com
पाने - ४ | Pages - 4
किंमत - ४.०० रुपये | Amout - 4 /- Rs
पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026
ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## पश्चिम बंगालमध्ये भाजपची सत्ता येणार, एक्झिट पोलचा अंदाज

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



नवी दिल्ली : पश्चिम बंगालमधील दुसऱ्या आणि शेवटच्या टप्प्याचे मतदान संपले आहे. पहिल्या टप्प्यात ९२ टक्क्यांपेक्षा जास्त आणि दुसऱ्या टप्प्यात ९० टक्क्यांपेक्षा जास्त मतदान झाले आहे. यामुळे ममता बॅनर्जी सत्ता राखणार की भाजपची सत्ता येणार यावरून चर्चेला उधाण आले आहे. या पार्श्वभूमीवर एक्झिट पोलचे अंदाज येण्यास सुरुवात झाली आहे. प्रमुख संस्थांच्या एक्झिट पोलच्या अंदाजांनुसार पश्चिम बंगालमध्ये भाजपची सत्ता येणार आहे.

प्रजा पोलच्या अंदाजानुसार पश्चिम बंगालमध्ये भाजप १७८ ते २०८ जागा जिंकेल तर पोल डायरीच्या अंदाजानुसार पश्चिम बंगालमध्ये भाजप १४२ ते १७१ जागांवर बाजी मारेल. मॅट्रिझच्या एक्झिट पोलनुसार भारतीय जनता पार्टी १४६ ते १६१ जागांवर विजयी होईल. चाणक्य स्टॅटेजीझच्या एक्झिट पोलने भाजप १५० ते १६० जागा जिंकेल असा अंदाज व्यक्त केला आहे. पश्चिम बंगालबाबतच्या जेव्हीसीच्या एक्झिट पोलनुसार भाजपला १५० ते १८० जागा जिंकता येतील. तसेच पीएमएआरक्यूच्या पश्चिम बंगालबाबतच्या एक्झिट पोलनुसार भाजप १५० ते १७५ जागा जिंकेल.

पश्चिम बंगालच्या विधानसभेत एकूण २९४ जागा आहेत. यामुळे १४७ किंवा त्यापेक्षा जास्त जागा जिंकल्यास स्पष्ट बहुमताच्या जोरावर भाजप सत्ता स्थापन करू शकेल. एक्झिट पोलचे अंदाज पश्चिम बंगालमध्ये भाजप बहुमत मिळवेल असाच अंदाज व्यक्त करत आहेत.

पश्चिम बंगालमधील सध्याची स्थिती

पश्चिम बंगालमध्ये सध्या तृणमूल काँग्रेसची सत्ता आहे. २९४ पैकी २२१ जागांवर विजय मिळवत तृणमूल काँग्रेसने २०२१ मध्ये राज्यात सत्ता स्थापन केली. भाजपने २०२१ च्या निवडणुकीत ६५ जागांवर विजय मिळवला होता. ही पश्चिम बंगालमधील भाजपची आतापर्यंतची सर्वोत्तम कामगिरी आहे.

पश्चिम बंगालमधील दुसऱ्या टप्प्याचे मतदान संपले आहे. नियमानुसार संध्याकाळी पाच वाजता मतदानाची वेळ संपली. आता जे मतदार रांगेत असतील फक्त त्यांनाच मतदान करता येईल. नव्याने कोणालाही मतदानासाठी रांगेत उभे राहण्याची परवानगी नसेल. यासाठी संबंधित मतदान केंद्रातले निवडणूक अधिकारी शेवटच्या मतदाराची नोंद करून ठेवतील, त्यानंतर सुरक्षा रक्षकांच्या बंदोबस्तात शेवटच्या मतदाराने हक्क बजावेपर्यंत मतदान प्रक्रिया सुरू राहणार आहे.

# राज्यात २०४७ पर्यंत ३०० कोटी वृक्ष लागवड होणार

### हरित महाराष्ट्र आयोग करणार नियोजन व अंमलबजावणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यात ३०० कोटी वृक्ष लागवडीचे लक्ष्य गाठण्यासाठी हरित महाराष्ट्र आयोगाची स्थापना करण्यास राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

राज्याने २०४७ पर्यंत ३०० कोटी झाडे लावण्याचे उद्दिष्ट्य ठेवले असून, त्याची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी आयोगावर सोपविण्यात आली आहे. आयोगाच्या नियामक मंडळाच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री असतील, तर उपमुख्यमंत्री उपाध्यक्ष, वन मंत्री, पर्यावरण व हवामान बदल मंत्री, कृषी मंत्री आणि रोजगार हमी योजना मंत्री सहउपाध्यक्ष असतील.

राष्ट्रीय वनधोरण १९८८ अनुसार देशाच्या एकूण भौगोलिक क्षेत्रापैकी ३३ टक्के क्षेत्र वनाच्छादित किंवा वृक्षाच्छादित असणे अपेक्षित आहे. राज्यात वनाच्छादित आणि वृक्षाच्छादित क्षेत्र अनुक्रमे १६.५३ व ४.७२ टक्के आहे. त्यामुळे एकूण क्षेत्र २१.२५ टक्के होत असून ते ३३ टक्क्यांपर्यंत वाढविण्यासाठी राज्याने दीर्घ नियोजन केले आहे. राज्याला हे उद्दिष्ट २०४७ पर्यंत साध्य करायचे आहे.

त्यासाठी ३०० कोटी वृक्षारोपण मोहिमेचे नियोजन, अंमलबजावणी, सनियंत्रण आणि वित्त पुरवठ्यासाठी हरित महाराष्ट्र आयोगाची स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली आहे. वृक्ष लागवडीसाठी जागेची उपलब्धता आणि लँड बँक निर्मितीवर भर दिला जाईल. सध्या २९ हजार चौरस किलोमीटर जमीन उपलब्ध आहे. ३०० कोटी वृक्ष लागवडीसाठी सुमारे २७ लाख हेक्टर जमिनीची आवश्यकता आहे.

राज्यातील वनाच्छादित, वृक्षाच्छादित तसेच गवताळ प्रदेशांचा गुणात्मक व परिणामात्मक विस्तार साध्य करणे, हवामान बदलास प्रतिसाद देण्याची क्षमता विकसित करणे, जलसंधारण सुधारणे, जमिनीचा पोत सुधारणे, जैवविविधतेचे संरक्षण करणे, स्थानिक स्तरावर रोजगार निर्मितीस चालना देणे तसेच स्थानिक नैसर्गिक परिसंस्थांचे जतन क्षेत्रनिहाय पर्यावरणपूरक दृष्टीकोनातून वृक्षलागवड करणे यावर आयोगाच्या माध्यमातून भर दिला जाणार आहे. जिल्हानिहाय लँड बँक विकसित केल्या जाणार आहेत. त्यामध्ये वन विभाग, मनरेगा व अन्य विभागांशी समन्वय साधून जमीन उपलब्ध करून घेतली जाणार आहे.

यामुळे सद्या विविध विभागांमार्फत सुरू असलेले वृक्षारोपण कार्यक्रम आणि अभियानाची एकात्मिक पद्धतीने अंमलबजावणी करणे शक्य होणार आहे. राज्यात ३०० कोटी वृक्ष लागवडीकरिता महत्वाकांक्षी वृक्षारोपण मोहीम. पायाभूत सुविधा उपक्रमांचे नियोजन आणि अंमलबजावणी व सनियंत्रण यासाठी हरित महाराष्ट्र आयोग काम करणार.

## महा डायलिसीस योजनेअंतर्गत नवीन बारा डायलिसीस केंद्रांचे १ मे रोजी होणार लोकार्पण; किडनी विकारग्रस्तांना दिलासा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : ग्रामीण भागातील किडनी विकारग्रस्त रुग्णांना शासकीय दवाखान्यात मोफत डायलिसीस सुविधा उपलब्ध करून देणाऱ्या महाडायलिसीस योजनेचा राज्यात महाराष्ट्र दिनी विस्तार करण्यात येणार आहे. सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांच्या हस्ते १ मे रोजी नवीन बारा डायलिसीस केंद्राचे लोकार्पण करण्यात येणार आहे. राज्यातील किडनी विकारग्रस्त नागरिकांना मोफत डायलिसीस सुविधा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने ‘महाडायलिसीस’ योजना सध्या विविध शासकीय रुग्णालयांत प्रभावीपणे राबवली जात आहे. या सुविधेमुळे राज्यातील हजारो किडनी विकारग्रस्त रुग्णांना मोठा दिलासा मिळत आहे.

ग्रामीण रुग्णालय, उपजिल्हा तसेच जिल्हा रुग्णालयांपर्यंत ही सेवा पोहाचवून ग्रामीण भागातील रुग्णांना घराजवळच निःशुल्क उपचार मिळावेत, हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. ग्रामीण रुग्णालयांत किमान ५ बेड्स, तर उपजिल्हा व जिल्हा रुग्णालयांत ८ ते १० डायलिसीस बेड्सची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. सध्या राज्यात ९२ महाडायलिसीस केंद्रे कार्यरत असून त्यामध्ये ५५८ डायलिसिस बेड्स उपलब्ध आहेत. महाराष्ट्र दिनी सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांच्या हस्ते १२ नवीन केंद्रांचे लोकार्पण होणार असून, त्यामुळे एकूण केंद्रांची संख्या १०४ वर पोहोचणार आहे. या नव्या केंद्रांमध्ये दुर्गम भागातील रुग्णालयांचाही समावेश करण्यात आला आहे.

लोकार्पण होणाऱ्या केंद्रांमध्ये मुरगुड (जि. कोल्हापूर), मूल (जि. चंद्रपूर), दारव्हा (जि. यवतमाळ), केज (जि. बीड), इगतपुरी (जि. नाशिक), रावेर (जि. जळगाव), मंगळवेढा (जि. सोलापूर), ढेबेवाडी (जि. सातारा), वेंगुर्ला (जि. सिंधुदुर्ग), कुरखेडा (जि. गडचिरोली), दापोली (जि. रत्नागिरी) आणि बदलापूर (जि. ठाणे) येथील रुग्णालयांचा समावेश आहे. ‘महाडायलिसीस’ योजना एंड-टू-एंड डिजिटल प्लॅटफॉर्मवर आधारित असून, हींिं://ारहरवळरश्रीूळी.ळप या संकेतस्थळावर तसेच मोबाइल ॲपद्वारे माहिती व सेवा उपलब्ध आहेत. रुग्णांना ऑनलाईन स्लॉट बुकिंगची सुविधा उपलब्ध करून दिल्यामुळे उपचारासाठी प्रतीक्षा कालावधी कमी झाला आहे. या केंद्रांमध्ये प्रशिक्षित डायलिसीस तंत्रज्ञ, नर्सेस व सहाय्यक कर्मचारी कार्यरत असून, नेफ्रोलॉजिस्ट यांच्या मार्गदर्शनाखाली उपचार दिले जात आहेत. स्वच्छता, सुरक्षितता आणि वैद्यकीय मानकांचे काटेकोर पालन केले जात आहे. तसेच रक्त तपासणी, आवश्यक इंजेक्शन आणि आहारतज्ज्ञांचा सल्ला यांसारख्या सेवा रुग्णांना पूर्णतः मोफत दिल्या जातात. ही योजना केंद्र शासनाच्या आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाअंतर्गत एचएलएल लाइफकेअर लिमिटेड या संस्थेमार्फत राबवली जात असून, सर्व केंद्रांमध्ये गुणवत्तापूर्ण सेवा देण्यावर भर दिला जात आहे. ‘महाडायलिसीस’ योजनेमुळे खासगी उपचारांवरील आर्थिक भार कमी होऊन सरकारी रुग्णालयांतच दर्जेदार व मोफत सेवा उपलब्ध झाल्याने राज्याच्या आरोग्य व्यवस्थेला मोठी बळकटी मिळत आहे.

## लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्समध्ये भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन, महाराष्ट्र शासनाकडून डॉक्टरेट करणाऱ्यांसाठी शिष्यवृत्ती

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



मुंबई : भारतीय घटनेचे शिल्पकार, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने प्रख्यात अशा लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स अँड पॉलिटिकल सायन्स संस्थेत अध्यासन स्थापनेचा महत्त्वपूर्ण निर्णय राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. अध्यासनाच्या माध्यमातून भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने डॉक्टरेटसाठी शिष्यवृत्तीही देण्याचा निर्णय घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचावे, त्यांच्या विचारांवर आधारित सामाजिक न्याय, संविधानिक लोकशाही, आर्थिक समता आणि मानवी हक्कांच्या अभ्यासासाठी जागतिक दर्जाचे संशोधन केंद्र निर्माण करणे, हा अध्यासन स्थापन करण्यामागील उद्देश आहे. अध्यासनात संविधान आणि लोकशाही, सामाजिक समता, आर्थिक लोकशाही आणि पुनर्वितरण धोरणे, श्रमिक हक्क आणि सामाजिक संरक्षण, संघराज्यवाद आणि सार्वजनिक वित्त, समावेशक शासन व्यवस्था आदी विषयांवरील आंतरशाखीय संशोधनाला प्रोत्साहन दिले जाणार आहे. राज्यघटना अध्ययन, सामाजिक न्याय आणि सार्वजनिक धोरण विषयांत प्रगत संशोधन करणे, वार्षिक व्याख्यानमाला, परिसंवाद आणि शैक्षणिक कार्यक्रम आयोजित करणे, लोकशाही आणि समावेशक विकास विषयक शैक्षणिक प्रकाशने आणि संशोधनाला चालना देणे, भारतीय आणि आंतरराष्ट्रीय संस्था संशोधकांमध्ये शैक्षणिक सहकार्य वाढवणे ही अध्यासनाची उद्दिष्ट्ये असणार आहेत. भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा बौध्दिक वारसा असलेल्या विधि, शासन, आंतरराष्ट्रीय विकास, तत्वज्ञान, अर्थशास्त्र आणि पब्लिक पॉलिसी या विषयांतील विद्वान प्राध्यापक लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्समध्ये कार्यरत आहेत. पहिल्या दहा वर्षात या अध्यासनासाठी या संस्थेतील विद्यमान प्राध्यापकांतून निवड केली जाईल. त्यानंतर भविष्यात आंतरराष्ट्रीय स्तरावर खुल्या निवड प्रक्रियेव्दारे भरती केली जाईल.


अध्यासनासाठी तत्वज्ञान, समाजशास्त्र, आंतरराष्ट्रीय विकास, शासन प्रशासन, विधि आणि सामाजिक धोरण असे संभाव्य विभाग असतील. अध्यासन स्थापन करण्यासाठी ३० लाख पौंड ( ३७ कोटी १३ लाख ८२,३०० रुपये) एकरकमी निधी दिला जाणार आहे. लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स ड पॉलिटिकल सायन्स, महाराष्ट्र शासन आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था यांच्या समन्वयाने दहा पीएचडी शिष्यवृत्ती देण्यास मान्यता देण्यात आली. पीएचडीचा कालावधी चार वर्षाचा असेल. पहिली शिष्यवृत्ती शैक्षणिक वर्ष २०२७-२८ पासून आणि दुसरी शिष्यवृत्ती २०२९-३० मध्ये सुरू करण्यात येणार आहे. शिष्यवृत्तीसाठी प्राप्त अर्जांची छाननी लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्सच्या समितीव्दारे केली जाईल. राज्यातील अनुसूचित जाती प्रवर्गातील इच्छुक उमेदवारांनी या योजनेअंतर्गत अर्ज करण्याची इच्छा स्पष्ट नमूद करणे आवश्यक असेल. त्यांचे अर्ज लंडन स्कूल ऑफ इकॉनॉम्क्सिमधील संबंधित विभागांकडून विचारात घेतले जातील. सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभाग आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था यांच्यामार्फत अर्ज करणाऱ्या उमेदवारांची आणि त्यांनी निवडलेल्या विभागांची माहिती लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्सला कळविली जाईल. शिष्यवृत्तीसाठीच्या अर्जांची छाननी लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्सच्या समितीव्दारे केली जाईल. पहिल्या दहा शिष्यवृत्तीसाठी महाराष्ट्र शासन, बार्टी आणि लंडन स्कूल इकॉनॉमिक्स यांच्यादरम्यान ५०:५० प्रमाणात अर्थसहाय्य करण्यात येणार आहे. २०२७-२८ वर्षात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी एक लाख ९१ हजार ३१७ पौंड खर्च अपेक्षित आहे. म्हणजेच दोन कोटी ३६ लाख ८३ ९१६ रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. यापैकी निम्मा म्हणजेच १ कोटी १८ लाख ४१ हजार ९५८ रुपये लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स कडून निधी देण्यात येणार आहे.

शिष्यवृत्ती कार्यक्रम राबविण्यासाठी बार्टी आणि लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स ड पॉलिटिकल सायन्स यांच्याबरोबर सामंजस्य करार केला जाईल. हा करार करण्यास, त्यानंतर अंतिम करार करण्यास आणि इतर आवश्यक परवानग्या घेण्यास राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

### स्टार्टअप व लघुउद्योगांसाठी भरीव तरतूद; सात स्तंभांवर उभे धोरण

# महाराष्ट्र एआय धोरण २०२६ जाहीर; दहा हजार कोटींची गुंतवणूक, दीड लाख रोजगार संधी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



मुंबई : राज्यातील उद्योग, प्रशासन आणि सार्वजनिक सेवांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा (एआय) व्यापक वापर वाढविण्यासाठी मंत्रिमंडळ बैठकीत ‘महाराष्ट्र एआय धोरण-२०२६’ जाहीर करण्यात आले. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

‘इंडिया एआय मिशन’च्या धर्तीवर राबविण्यात येणाऱ्या या धोरणाच्या माध्यमातून संशोधन, नवोपक्रम आणि जबाबदार प्रशासन यांना चालना देण्यात येणार आहे. आगामी काळात कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे ७० टक्के नोकऱ्यांचे स्वरूप बदलणार आहे, त्यामुळे या धोरणात वेळेनुसार काळानुरूप बदल करण्याच्या सूचना मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी दिल्या. २०३१ पर्यंत दहा हजार कोटी रुपयांहून अधिक गुंतवणूक आकर्षित करणे आणि दीड लाखांहून अधिक रोजगार निर्माण करणे, हे या धोरणाचे उद्दिष्ट आहेत.

जागतिक पातळीवर कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रात अनेक देशांची स्पर्धा सुरु असताना महाराष्ट्राने ‘नैतिक व सर्वसमावेशक कृत्रिम बुद्धिमत्ता विकासाचे राष्ट्रीय केंद्र’ ही आपली ओळख निर्माण करण्याचे लक्ष्य ठेवले आहे. त्यासाठी ‘महाराष्ट्र एआय मिशन’ स्थापन करण्याचा प्रस्ताव या धोरणात मांडण्यात आला आहे. राज्यातील दोन लाख युवक व व्यावसायिकांना कृत्रिम बुद्धिमत्तेचे कौशल्य प्रशिक्षण देण्याची योजनाही यात अंतर्भूत आहे.

नैतिक कृत्रिम बुद्धिमत्तेच्या विकासात महाराष्ट्राने ‘इंडिया एआय मिशन’साठी संदर्भ राज्य म्हणून ओळख मिळवावी हाच या धोरणाचा आत्मा आहे. हे धोरण सात आधारस्तंभांवर उभारण्यात आले आहे. पहिला आणि सर्वात महत्त्वाचा स्तंभ म्हणजे राज्यव्यापी एआय पायाभूत सुविधांचा विकास. यात किमान दोन हजार जीपीयू संगणन क्षमता उपलब्ध करणे आणि ‘कम्प्युट ॲज अ सर्व्हिस’ या संकल्पनेतून शासकीय विभागांनाही या सुविधा वापरता येतील, अशी यंत्रणा उभारण्याचे नियोजन आहे. पाच नवोन्मेष क्षेत्रांमध्ये एआय शहरेही विकसित केली जाणार आहेत. दुसरा महत्त्वाचा स्तंभ म्हणजे स्थानिक डेटाचा वापर. मराठी भाषेसह प्रादेशिक बोलीभाषा आणि आदिवासी भाषांचे डेटासेट्स तयार करणे आणि ‘स्टेट एआय डेटा एक्सचेंज’ स्थापन करणे, हे या भागाचे वैशिष्ट्य असेल. केंद्र सरकारच्या ‘एआय कोष’ व्यासपीठाशी राज्याची यंत्रणा जोडली जाणार आहे. तिसऱ्या स्तंभात ‘महाराष्ट्र प्रगत कृत्रिम बुद्धिमत्ता प्रशिक्षण केंद्र’ (एमसीएटी) स्थापन करण्याची योजना आहे. उद्योग आणि शैक्षणिक संस्था यांच्या दुहेरी भागीदारीतून हे केंद्र कार्य करेल. लघु व मध्यम उद्योगांना (एमएसएमई) एआय क्षेत्रात आणण्यासाठी धोरणात विशेष तरतूद आहे. पाच हजार एमएसएमई ना एआय अंमलबजावणी खर्चावर २० टक्के अनुदान दिले जाणार असून ‘महा एआय टूल्स हब’ हे केंद्रीय व्यासपीठ स्थापन केले जाणार आहे. स्टार्टअप परिसंस्था बळकट करण्यासाठी ५०० कोटी रुपयांचा समर्पित ‘एआय स्टार्टअप व्हेंचर फंड’ उभारण्यात येणार असून त्यात शासनाचे २५० कोटी आणि उद्योग क्षेत्राचे २५० कोटी असे योगदान अपेक्षित आहे. राज्यातील किमान एका एआय युनिकॉर्नच्या उभारणीस पाठबळ देणे हेही धोरणाचे उद्दिष्ट आहे.

पाचव्या स्तंभात राज्यभरात १२ एआय इनक्युबेटर्स उभारले जातील. प्रत्येक स्टार्टअपला एक कोटी रुपयांपर्यंत अनुदान मिळणार असून महिला नेतृत्वाखालील स्टार्टअप्सना एक कोटी २५ लाखांपर्यंत आणि २५ टक्के अतिरिक्त आर्थिक सहाय्य दिले जाईल. सहाव्या स्तंभांतर्गत आरोग्य, कृषी, शिक्षण, नगर विकास, मराठी भाषा-संस्कृती आणि वित्त-महसूल या सहा क्षेत्रांत उत्कृष्टता केंद्रे स्थापन केली जातील. सातव्या आणि अंतिम स्तंभात नैतिक एआय वापरासाठी कायमस्वरूपी आराखडा तयार केला जाईल आणि प्रत्येक शासकीय विभागात वार्षिक एआय सज्जता लेखापरीक्षण बंधनकारक केले जाईल.

उद्योगांना आकर्षित करण्यासाठी धोरणात भरीव आर्थिक सवलती जाहीर करण्यात आल्या आहेत. स्थिर भांडवली गुंतवणुकीवर कमाल २० टक्के भांडवली अनुदान, १०० टक्के मुद्रांक शुल्क माफी, दहा वर्षांपर्यंत प्रति युनिट दोन रुपये वीज दर अनुदान, देशांतर्गत पेटंटसाठी आठ लाख व आंतरराष्ट्रीय पेटंटसाठी दहा लाख रुपयांपर्यंत खर्च परतावा आणि २५ लाखांपर्यंत प्रमाणन खर्च परतावा अशा सवलती यात अंतर्भूत आहेत. आंतरराष्ट्रीय प्रदर्शनांमध्ये सहभागी होणाऱ्या उद्योगांना २५ लाखांपर्यंत भाडे परतावाही दिला जाणार आहे. यामुळे महाराष्ट्राचे एआयच्या विश्वात महाराष्ट्राचे महत्वाकांक्षी पाऊल टाकले जाणार आहे.

## संपादकीय....

### चर्चांणा उधाण

पश्चिम बंगालमधील दुसऱ्या आणि शेवटच्या टप्प्याचे मतदान संपले आहे. पहिल्या टप्प्यात ९२ टक्क्यांपेक्षा जास्त आणि दुसऱ्या टप्प्यात ९० टक्क्यांपेक्षा जास्त मतदान झाले आहे. यामुळे ममता बॅनर्जी सत्ता राखणार की भाजपची सत्ता येणार यावरून चर्चेला उधाण आले आहे. या पार्श्वभूमीवर एक्झिट पोलचे अंदाज येण्यास सुरुवात झाली आहे. प्रमुख संस्थांच्या एक्झिट पोलच्या अंदाजांनुसार पश्चिम बंगालमध्ये भाजपची सत्ता येणार आहे. प्रजा पोलच्या अंदाजानुसार पश्चिम बंगालमध्ये भाजप १७८ ते २०८ जागा जिंकेल तर पोल डायरीच्या अंदाजानुसार पश्चिम बंगालमध्ये भाजप १४२ ते १७१ जागांवर बाजी मारेल. मॅट्रिझच्या एक्झिट पोलनुसार भारतीय जनता पार्टी १४६ ते १६१ जागांवर विजयी होईल. चाणक्य स्टॅटेजीझच्या एक्झिट पोलने भाजप १५० ते १६० जागा जिंकेल असा अंदाज व्यक्त केला आहे. पश्चिम बंगालबाबतच्या जेव्हीसीच्या एक्झिट पोलनुसार भाजपला १५० ते १८० जागा जिंकता येतील. तसेच पीएमएआरक्यूच्या पश्चिम बंगालबाबतच्या एक्झिट पोलनुसार भाजप १५० ते १७५ जागा जिंकेल. पश्चिम बंगालच्या विधानसभेत एकूण २९४ जागा आहेत. यामुळे १४७ किंवा त्यापेक्षा जास्त जागा जिंकल्यास स्पष्ट बहुमताच्या जोरावर भाजप सत्ता स्थापन करू शकेल. एक्झिट पोलचे अंदाज पश्चिम बंगालमध्ये भाजप बहुमत मिळवेल असाच अंदाज व्यक्त करत आहेत.

## दिव्यांग विद्यार्थ्यांच्या दहावीनंतरच्या शिष्यवृत्तीमध्ये १२ वर्षानंतर भरीव वाढ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : दिव्यांग विद्यार्थ्यांना दहावीनंतरच्या शिक्षणासाठी पाठबळ मिळेल अशारितीने शिष्यवृत्तीमध्ये भरीव वाढ करण्यास मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. १२ वर्षानंतर दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीमध्ये पहिल्यांदाच भरीव वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आल्याने या विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे.

उच्च माध्यमिक परिक्षोत्तर शिक्षण घेणाऱ्या दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती योजना' या सुधारित योजनेंतर्गत विद्यार्थ्यांना विद्यापीठ/संस्था/शिक्षण मंडळाला भरावे लागणारे शुल्क, प्रवेश फी, ट्युशन फी, नोंदणी फी, खेळ, यूनीयन, लायब्ररी, मॅगझिन, वैद्यकीय तपासणी यासारखे इतर द्यावे लागणारे अनिवार्य शुल्काकरिता रक्कम मंजूर करण्यात येणार आहे. त्याचबरोबर शिक्षण शुल्काव्यतिरिक्त विद्यार्थ्यांना पुढीलप्रमाणे वित्तीय सहाय्य निश्चित करण्यात आले आहे. अर्थसहाय्य दरमहा या प्रमाणे. (कंसात पूर्वीचे दर), गट १ अंतर्गत पदवी व पदव्युत्तर शिक्षणासाठी, पदव्युत्तर डिप्लोमासाठी निवासी विद्यार्थ्यास १७०० (१२००) तर अनिवासी विद्यार्थ्यास ९०० (५५०) रु., गट २ अंतर्गत इतर व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी निवासी विद्यार्थ्यास १२०० (८२०) तर अनिवासीसाठी ८५० (५३०) रु., गट ३ अंतर्गत वरील दोन्ही गटात समाविष्ट नसलेल्या पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी निवासी विद्यार्थ्यास १२०० (८२०) तर अनिवासीसाठी ८५० (५३०) रु., गट ४ अंतर्गत इयत्ता दहावीनंतरच्या पदवीतर डिप्लोमांसाठी निवासी विद्यार्थ्यास ११०० (५७०) तर अनिवासीसाठी ८०० (३००) रु. वित्तीय सहाय्य.

अंध विद्यार्थ्यांसाठी वाचक भत्ता गट १,२ आणि ३ साठी ३०० (१००) रुपये तर गट चार साठी २२५ (७५)रु. अभ्यास दौरा खर्चासाठी वार्षिक १५०० (५००) रुपये (प्रत्यक्ष खर्चाच्या मर्यादेत) तर प्रकल्प (थेसिस) टंकलेखन व छपाई खर्च तसेच पत्रव्यवहाराद्वारे शिक्षणासाठी प्रकल्प (थेसिस) टंकलेखन व छपाई खर्च व पुस्तकासाठीचा भत्ता १८०० (६००) रुपये करण्यात आला आहे. दिव्यांग विद्यार्थ्यांना प्रकल्प, टंकलेखन, छपाई व पत्रव्यवहार, पुस्तकासाठी म्हणून आता १८०० रुपये (प्रत्यक्ष खर्चाच्या मर्यादेत) अभ्यास दौऱ्यासाठी १५०० रुपये आणि शिक्षण शुल्काची प्रतिपूर्ती संपूर्ण रक्कम मिळणार आहे. याशिवाय अंध विद्यार्थ्यांना आता वाचक भत्ता म्हणून गट १,२, ३ साठी दरमहा ३०० आणि गट ४ साठी २२५ रुपये दरमहा मिळणार आहेत.

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे विचार आणि कार्य

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

दि. ३० एप्रिल हा दिवस महाराष्ट्राच्या संतपरंपरेतील एक तेजस्वी स्मरणदिन म्हणून साजरा केला जातो. या दिवशी राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांची जयंती मोठ्या उत्साहात आणि श्रद्धेने पाळली जाते. हा दिवस केवळ एका संताच्या जन्माचा उत्सव नसून, तो समाजजागृतीच्या, ग्रामविकासाच्या आणि मानवतेच्या मूल्यांच्या पुनर्स्मरणाचा दिवस आहे. तुकडोजी महाराजांनी आपल्या संपूर्ण जीवनकार्याद्वारे भारतीय समाजाला केवळ आध्यात्मिक उन्नतीचा मार्ग दाखवला नाही, तर सामाजिक परिवर्तन, राष्ट्रीय बांधणी आणि ग्रामविकासाची एक सशक्त संकल्पना प्रत्यक्षात आणली. त्यांच्या कार्यात अध्यात्म आणि समाजकार्य यांचा सुंदर संगम दिसून येतो. तुकडोजी महाराजांचा जन्म ३० एप्रिल १९०९ रोजी अमरावती जिल्ह्यातील यावली या लहानशा गावात झाला. त्यांचे बालपण अत्यंत साध्या आणि कष्टमय परिस्थितीत गेले. परंतु या परिस्थितीने त्यांना खचवले नाही, उलट त्यांच्यातील संवेदनशीलता, करुणा आणि समाजाविषयीची बांधिलकी अधिकच दृढ झाली. लहान वयातच त्यांना अध्यात्मिक ओढ निर्माण झाली आणि संतपरंपरेतील मूल्यांचा प्रभाव त्यांच्या मनावर पडला. त्यांच्या गुरूंच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी आध्यात्मिक साधना केली आणि त्यातूनच त्यांच्या जीवनाला एक स्पष्ट दिशा मिळाली.

तुकडोजी महाराजांचे व्यक्तिमत्त्व अत्यंत प्रभावी आणि बहुआयामी होते. ते केवळ संत नव्हते, तर ते एक उत्कृष्ट वक्ते, कवी, कीर्तनकार, समाजसुधारक आणि राष्ट्रप्रेमी होते. त्यांनी आपल्या ओजस्वी वाणीने आणि सुलभ भाषेतून सामान्य जनतेपर्यंत आपले विचार पोहोचवले. त्यांच्या कीर्तनांमध्ये केवळ धार्मिक विषय नव्हते, तर सामाजिक समस्यांवर भाष्य करणारा आशय होता. त्यांनी अंधश्रद्धा, जातिभेद, अस्पृश्यता, अशिक्षण, व्यसनाधीनता यांसारख्या समस्यांवर कठोर शब्दांत टीका केली आणि समाजाला जागृत करण्याचा प्रयत्न केला. तुकडोजी महाराजांनी भजन-कीर्तनाला केवळ धार्मिक विधी म्हणून न पाहता, ते समाजजागृतीचे प्रभावी साधन बनवले. त्यांच्या कीर्तनांमध्ये लोकभाषेचा वापर असल्यामुळे ते सर्वसामान्य लोकांना सहज समजत. त्यांनी लोकांच्या मनातील अज्ञान, भीती आणि अंधश्रद्धा दूर करण्यासाठी सोप्या आणि प्रभावी पद्धतीचा अवलंब केला. त्यांच्या कीर्तनांमुळे अनेक लोकांच्या जीवनात सकारात्मक बदल घडले आणि समाजात जागृती निर्माण झाली. त्यांच्या कार्यातील सर्वात महत्त्वाचा पैलू म्हणजे 'ग्रामगीता' हा ग्रंथ. ग्रामगीता हा केवळ धार्मिक ग्रंथ नसून, तो ग्रामविकासाचे तत्त्वज्ञान मांडणारा एक व्यापक आणि सखोल ग्रंथ आहे. या ग्रंथामध्ये त्यांनी आदर्श गावाची संकल्पना मांडली आहे. गावातील स्वच्छता, शिक्षण, आरोग्य, शेती, उद्योग, सामाजिक ऐक्य, नैतिक मूल्ये यांचा सखोल विचार त्यांनी ग्रामगीतेमध्ये मांडला आहे. त्यांच्या मते, गावाचा विकास म्हणजे देशाचा विकास. त्यामुळे प्रत्येक गाव स्वावलंबी, स्वच्छ आणि सुसंस्कृत असणे आवश्यक आहे.

ग्रामगीतेतील विचार आजच्या काळातही अत्यंत महत्त्वाचे आहेत. आजही ग्रामीण भागात अनेक समस्या आहेत. अस्वच्छता, अशिक्षण, बेरोजगारी, सामाजिक विषमता. या सर्व समस्यांवर उपाय म्हणून तुकडोजी महाराजांनी दिलेले विचार अत्यंत उपयुक्त ठरतात. त्यांनी ग्रामविकासाला एक सामाजिक चळवळ बनवण्याचा प्रयत्न केला. त्यांनी लोकांना आपल्या गावाच्या विकासासाठी स्वतः पुढाकार घेण्याचे आवाहन केले. तुकडोजी महाराजांनी स्वातंत्र्य चळवळीतही महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. त्यांच्या कीर्तनांमधून त्यांनी स्वातंत्र्याची जाज्वल्य भावना लोकांच्या मनात निर्माण केली. त्यांनी ब्रिटिश सत्तेविरुद्ध लोकांना प्रेरित केले आणि राष्ट्रीय चेतना जागृत केली. त्यांच्या कार्यामुळे त्यांना अनेक वेळा तुरुंगवास सहन करावा लागला. परंतु त्यांनी कधीही आपल्या ध्येयापासून माघार घेतली नाही. त्यांच्या राष्ट्रप्रेमाची भावना अत्यंत प्रखर होती.

स्वातंत्र्यानंतरही त्यांनी आपले कार्य थांबवले नाही. त्यांनी राष्ट्रनिर्माणाच्या कार्यात स्वतःला झोकून दिले. त्यांनी लोकांना स्वावलंबन, शिस्त, सामाजिक जबाबदारी आणि नैतिक मूल्यांचे महत्त्व पटवून दिले. त्यांनी ग्रामीण भागातील लोकांना संघटित करून विकासाच्या कार्यात सहभागी केले. स्वच्छतेबाबत त्यांचे विचार अत्यंत प्रगत होते. त्यांनी 'स्वच्छ गाव, सुंदर गाव' ही संकल्पना रुजवली. त्यांनी स्वतः झाडू घेऊन गाव स्वच्छ करण्याचे कार्य केले. त्यांच्या या कृतीतून त्यांनी समाजाला एक महत्त्वाचा संदेश दिला. बदल घडवायचा असेल तर स्वतःपासून सुरुवात करावी लागते. त्यांनी लोकांना स्वच्छतेचे महत्त्व पटवून दिले आणि स्वच्छतेला सामाजिक जबाबदारीचे रूप दिले.

तुकडोजी महाराजांनी शिक्षणाला विशेष महत्त्व दिले. त्यांच्या मते, शिक्षण हे समाजाच्या विकासाचे मुख्य साधन आहे. त्यांनी ग्रामीण भागात शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी प्रयत्न केले. त्यांनी लोकांना आपल्या मुलांना शिक्षण देण्यास प्रोत्साहित केले. त्यांनी नैतिक शिक्षणावर भर दिला आणि समाजात मूल्यांची जपणूक करण्याचा संदेश दिला. त्यांच्या विचारांमध्ये स्त्री-पुरुष समानतेचा स्पष्ट आग्रह दिसून येतो. त्यांनी स्त्रियांच्या शिक्षणावर आणि सक्षमीकरणावर भर दिला. त्यांनी समाजातील स्त्रियांना समान स्थान मिळावे यासाठी प्रयत्न केले. त्यांच्या विचारांमुळे समाजात स्त्रियांविषयी सकारात्मक बदल घडून आले.



तुकडोजी महाराजांचे विचार हे अत्यंत व्यापक आणि सर्वसमावेशक होते. त्यांनी धर्म, जात, पंथ यांच्या पलीकडे जाऊन मानवतेचा विचार मांडला. त्यांच्या मते, सर्व धर्मांचा मूलभूत संदेश एकच आहे तो म्हणजे मानवतेची सेवा होय. त्यांनी समाजात बंधुभाव आणि ऐक्य निर्माण करण्याचा प्रयत्न केला. आजच्या काळात तुकडोजी महाराजांचे विचार अधिकच महत्त्वाचे ठरतात. वाढती भौतिकता, सामाजिक असमानता, पर्यावरणीय समस्या आणि नैतिक मूल्यांचा ऱ्हास या पार्श्वभूमीवर त्यांच्या विचारांची गरज अधिक तीव्रतेने जाणवते. त्यांनी दिलेला ग्रामविकासाचा आणि मानवतेचा संदेश आजही तितकाच उपयुक्त आहे.

तुकडोजी महाराजांच्या कार्याचा आणखी एक अत्यंत महत्त्वाचा पैलू म्हणजे त्यांनी ग्रामविकासाला केवळ आर्थिक किंवा भौतिक प्रगतीच्या चौकटीत न ठेवता त्याला एक सर्वांगीण आणि मूल्याधिष्ठित स्वरूप दिले. त्यांच्या दृष्टीने ग्रामविकास म्हणजे केवळ रस्ते, पाणी किंवा शेतीपुरते मर्यादित नव्हते, तर तो मानवी जीवनाच्या सर्व अंगांना स्पर्श करणारा होता. त्यांनी ग्रामजीवनातील नैतिकता, परस्पर सहकार्य, सामूहिक जबाबदारी आणि आत्मसन्मान यांना विशेष महत्त्व दिले. त्यांच्या मते, जर गावातील प्रत्येक व्यक्ती स्वतःच्या कर्तव्याची जाणीव ठेवून कार्य करेल, तर गाव आपोआप प्रगत होईल. ही विचारधारा आजच्या शाश्वत विकासाच्या संकल्पनेशी पूर्णपणे सुसंगत आहे.

तुकडोजी महाराजांनी ग्राम स्वराज्याच्या संकल्पनेला एक वेगळा अर्थ दिला. त्यांनी ग्रामस्वराज्याला केवळ राजकीय स्वायत्तता म्हणून न पाहता, ते सामाजिक आणि आर्थिक स्वावलंबनाचे प्रतीक मानले. त्यांनी गावांनी बाह्य अवलंबित्व कमी करून स्वतःच्या संसाधनांचा योग्य वापर करावा, स्थानिक कौशल्यांचा विकास करावा आणि स्वयंपूर्णतेकडे वाटचाल करावी, असे प्रतिपादन केले. आजच्या जागतिकीकरणाच्या युगातही त्यांचे हे विचार अत्यंत उपयुक्त आणि मार्गदर्शक ठरतात. त्यांच्या कार्यात युवकांच्या भूमिकेला विशेष स्थान होते. त्यांनी युवकांना समाजपरिवर्तनाचे मुख्य घटक मानले. त्यांनी युवकांना केवळ शिक्षण घेण्यापुरते मर्यादित न राहता, समाजसेवा, राष्ट्रसेवा आणि नैतिक मूल्यांच्या जपणुकीसाठी पुढे येण्याचे आवाहन केले. त्यांच्या कीर्तनांमध्ये आणि प्रवचनांमध्ये युवकांना प्रेरणा देणारे संदेश असत. त्यांनी युवकांना व्यसनमुक्त जीवन, शिस्तबद्ध वर्तन आणि समाजासाठी योगदान देण्याची प्रेरणा दिली.

तुकडोजी महाराजांनी पर्यावरण संरक्षणालाही अप्रत्यक्षपणे महत्त्व दिले. त्यांनी स्वच्छतेवर, निसर्गाशी सुसंवाद ठेवण्यावर आणि साधेपणाने जीवन जगण्यावर भर दिला. त्यांच्या विचारांमध्ये पर्यावरणपूरक जीवनशैलीचा आग्रह दिसून येतो. आजच्या काळात वाढत्या पर्यावरणीय संकटाच्या पार्श्वभूमीवर त्यांच्या या विचारांचे महत्त्व अधिक अधोरेखित होते. त्यांच्या कार्याचा प्रभाव केवळ ग्रामीण भागापुरता मर्यादित राहिला नाही, तर त्यांनी संपूर्ण समाजावर एक सकारात्मक परिणाम घडवून आणला. त्यांनी लोकांना एकत्र आणले, सामाजिक ऐक्य निर्माण केले आणि समाजात बंधुभावाची भावना रुजवली. त्यांच्या कार्यामुळे अनेक लोकांनी आपले जीवन बदलले आणि समाजासाठी कार्य करण्याची प्रेरणा घेतली.

भारत सरकारने त्यांच्या कार्याची दखल घेऊन त्यांना 'राष्ट्रसंत' ही उपाधी बहाल केली. ही उपाधी त्यांच्या कार्याचा गौरव करणारी आहे. परंतु त्यांच्या खऱ्या महानतेचे मोजमाप त्यांच्या कार्यातून समाजात घडलेल्या परिवर्तनातूनच करता येते. त्यांनी कोणत्याही प्रकारचा स्वार्थ न बाळगता, निस्वार्थ भावनेने समाजासाठी कार्य केले. त्यांच्या जीवनात साधेपणा आणि प्रामाणिकता यांचे अद्वितीय उदाहरण दिसून येते. आजच्या काळात समाज अनेक समस्यांना सामोरे जात आहे. सामाजिक असमानता, बेरोजगारी, पर्यावरणीय संकट, नैतिक मूल्यांचा ऱ्हास. या सर्व समस्यांवर उपाय शोधताना तुकडोजी महाराजांचे विचार अत्यंत उपयुक्त ठरू शकतात. त्यांनी दिलेला ग्रामविकासाचा, स्वावलंबनाचा, स्वच्छतेचा आणि मानवतेचा संदेश आजही तितकाच महत्त्वाचा आहे. तुकडोजी महाराजांच्या विचारांचा अभ्यास करताना असे जाणवते की, त्यांनी समाजाला दिलेले संदेश हे केवळ त्या काळापुरते मर्यादित नसून ते सर्वकालीन आणि सार्वत्रिक आहेत. त्यांनी दिलेला मानवतेचा संदेश, समतेचा विचार आणि राष्ट्रप्रेमाची भावना आजच्या पिढीसाठी मार्गदर्शक ठरू शकते. त्यांच्या कार्यातून आपण शिकू शकतो की, समाजात परिवर्तन घडवायचे असेल तर केवळ विचार पुरेसे नसतात, तर त्यासाठी कृती आवश्यक असते.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांची जयंती साजरी करताना त्यांच्या विचारांचे केवळ स्मरण करणे पुरेसे नाही. त्यांच्या विचारांची अंमलबजावणी करणे हीच खरी त्यांना श्रद्धांजली ठरेल. प्रत्येकाने आपल्या जीवनात त्यांच्या मूल्यांचा स्वीकार करून समाजासाठी काहीतरी करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. ग्रामविकासासाठी, स्वच्छतेसाठी, शिक्षणासाठी आणि सामाजिक ऐक्यासाठी प्रत्येकाने आपले योगदान दिले पाहिजे. आजच्या तरुण पिढीसमोर अनेक संधी आणि आव्हाने आहेत. तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे जीवन अधिक सोपे झाले असले तरी नैतिक मूल्यांचा ऱ्हास होत आहे. अशा परिस्थितीत तुकडोजी महाराजांचे विचार तरुणांना योग्य दिशा देऊ शकतात. त्यांनी दिलेला साधेपणाचा, प्रामाणिकतेचा आणि सेवाभावाचा संदेश आजही तितकाच प्रभावी आहे.

शेवटी, राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे जीवन आणि कार्य हे आपल्या समाजासाठी एक अमूल्य ठेवा आहे. त्यांच्या विचारांची प्रेरणा घेऊन आपण आपल्या जीवनात आणि समाजात सकारात्मक बदल घडवू शकतो. त्यांच्या जयंतीनिमित्त आपण त्यांच्या आदर्शांचा अंगीकार करूया, त्यांच्या विचारांची अंमलबजावणी करूया आणि त्यांच्या मार्गावर चालण्याचा संकल्प करूया. हीच त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल. त्यांच्या कार्याचा वारसा पुढे नेणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. त्यांच्या ग्रामगीतेतील विचारांना आपल्या जीवनात स्थान देऊन आपण एक सशक्त, समृद्ध आणि नैतिक मूल्यांनी परिपूर्ण समाज निर्माण करू शकतो. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे कार्य हे केवळ इतिहासाचा भाग नसून, ते वर्तमान आणि भविष्याच्या दिशादर्शनासाठी एक प्रकाशस्तंभ आहे. त्यांच्या जयंतीनिमित्त त्यांना विनम्र अभिवादन करताना आपण त्यांच्या विचारांचे अनुकरण करण्याचा दृढ संकल्प करूया, हीच खरी कृतज्ञता ठरेल.

**डॉ. राजेंद्र बगाटे, (लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)**
**ईमेल** – bagate.rajendra5@gmail.com

## ग्रामपंचायत पोटनिवडणुकीत रुपाली रेवणसिद्ध बोरगांव यांचा दणदणीत विजय!




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

भाजप कार्यालय, अक्कलकोट : ग्रामपंचायत सलगर पोटनिवडणुकीत सौ. रुपाली रेवणसिद्ध बोरगांव यांनी उल्लेखनीय विजय संपादन करत जनतेचा विश्वास संपादन केला आहे. या विजयाबद्दल भारतीय जनता पक्षाच्या अक्कलकोट येथील कार्यालयात जल्लोषपूर्ण वातावरणात सत्कार व अभिनंदन सोहळा पार पडला. यावेळी नगराध्यक्ष मिलन दादा कल्याणशेट्टी यांच्याहस्ते सत्कार करून शुभेच्छा देण्यात आले यावेळी प्रवीण शटगार अमोल पुटगे यासह असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते

या प्रसंगी कार्यकर्त्यांनी उत्साहात आनंद साजरा करत विजयाचा जल्लोष केला. स्थानिक नागरिक व पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत सौ. रुपाली बोरगांव यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या. त्यांच्या नेतृत्वातून गावाच्या विकासाला नवी दिशा मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

## रत्नागिरीतील मौजे नाचणे येथे केंद्रीय विद्यालय होणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : रत्नागिरी जिल्ह्यातील मौजे नाचणे येथे नवीन केंद्रीय विद्यालय स्थापन करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. या नवीन विद्यालयासाठी अडीच हेक्टर जमीन देण्यास मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. यामुळे कोकणातील होतकरू विद्यार्थ्यांसाठी शिक्षणासाठी आणखी एक महत्वाची सुविधा उपलब्ध होणार आहे.

केंद्र सरकारने देशात ८५ नवीन केंद्रीय विद्यालये सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामध्ये महाराष्ट्रातील अकोला आणि रत्नागिरीचा समावेश आहे. त्यानुसार रत्नागिरी जिल्ह्यातील मौजे नाचणे ( म्यु. आत, ता. जि. रत्नागिरी) येथे भारत सरकारच्या केंद्रीय विद्यालय संघटन यांच्या माध्यमातून नवीन केंद्रीय विद्यालय उभारण्यासाठी या जागेची मागणी करण्यात आली होती. त्यानुसार मौजे नाचणे म्यु. आत येथील सर्व्हे क्रमांक ९३ मधील अडीच हेक्टर जमीन केंद्रीय विद्यालय संगठनास वर्ग दोन धारणाधिकाराने देण्यास मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे.

यामुळे भविष्यात रत्नागिरी जिल्हयात केंद्रीय स्तरावरील आणि राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय दर्जाशी सुसंगत अशी शिक्षण सुविधा या केंद्रीय विद्यालयाच्या स्थापनेमुळे उपलब्ध होणार आहे.

## अखेर पुरंदर विमानतळाचे पॅकेज ठरले




पुरंदर प्रतिनिधी/डॉ. विनायक गायकवाड : पुरंदर ::पुरंदर तालुक्यात प्रस्तावित असलेल्या छत्रपती संभाजीराजे आंतरराष्ट्रीय विमानतळासाठी भूसंपादनाचा दर अखेर निश्चित झाला असून, येत्या सोमवार दि. ४ मे पासून बाधित शेतकऱ्यांना प्रत्यक्ष मोबदल्याचे वितरण सुरू होणार आहे. या पार्श्वभूमीवर मंगळवारी शेकडो शेतकऱ्यांनी जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांची भेट घेऊन मोबदल्याबाबत चर्चा केली. प्रशासनाकडून शेतकऱ्यांना योग्य आणि समाधानकारक मोबदला देण्याचा दावा करण्यात आला आहे.

या प्रकल्पासाठी सुमारे १,९८० हून अधिक शेतकऱ्यांनी तब्बल तीन हजार एकर जमिनीच्या संमतीपत्रांवर स्वाक्षऱ्या केल्या आहेत. भूसंपादनाची प्रक्रिया पूर्ण झाली असून, पुढील टप्प्यात महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (एमआयडीसी) मार्फत प्रत्यक्ष जमीन हस्तांतरणाची कार्यवाही केली जाणार आहे. यासाठी सुमारे सहा हजार कोटी रुपयांचा निधी कर्जाच्या स्वरूपात उभारण्यात येणार असून, राज्य शासनाने त्याला संमती दिली आहे.

**महत्त्वाचे मुद्दे..**

एकरी दीड कोटी रुपयांपेक्षा अधिक दर

भूखंडाचाही लाभ मिळणार

दरम्यान, शेतकऱ्यांमध्ये किमान १ कोटी ५१ लाख रुपयांपर्यंत मोबदला मिळणार असल्याची चर्चा रंगली आहे. काही शेतकऱ्यांनी बैठकीनंतर ही माहिती दिली. याशिवाय जमीन देणाऱ्यांना विकसित भूखंडासह चौपट मोबदला देण्याची तरतूदही केली आहे. विशेषतः अल्पभूधारक शेतकऱ्यांनाही न्याय्य मोबदला मिळेल, असे प्रशासनाने स्पष्ट केले. मे महिन्याच्या पहिल्या आठवड्यात मोबदलावाटप सुरू होऊन जूनच्या पहिल्या आठवड्यापर्यंत ही प्रक्रिया पूर्ण करण्याचे नियोजन आहे. त्यानंतर प्रत्यक्ष भूसंपादन आणि प्रकल्प उभारणीला गती मिळणार आहे. या विमानतळासाठी एखतपूर, कुंभारवळण, खानवडी, मुंजवडी, उदाचीवाडी, पारगाव आणि वनपुरी या सात गावांतील जमीन संपादित करण्यात आली आहे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल – yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय :** सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय :** प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# समाजकल्याण व दिव्यांगकल्याण विभागाच्या लोककल्याणकारी योजना गरजूपर्यंत पोहचविणार

## समाज कल्याण सभापती संस्कृती सातपुते यांचे प्रतिपादन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : जिल्हा परिषदेचा समाजकल्याण विभाग हा ग्रामीण जीवनातील योजनांचा अंमलबजावणी करणारा महत्वाचा विभाग आहे. या विभागाच्या लोककल्याणकारी योजना गरीब व गरजू लाभार्थ्यांपर्यत तसेच शालेय विद्यार्थी व विद्यार्थीनी तसेच दिव्यांग बंधु- भगीनी यांच्यापर्यत पोहोचविण्यासाठी हा विभाग सदैव तत्पर राहील त्यासाठी प्रशासन व लोकप्रतिनिधी यांच्या सहकार्याची भुमिका अतिशय महत्वाची आहे. असे प्रतिपादन जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण विभागाच्या समितीच्या समन्वय सभेमध्ये समाज कल्याण सभापती सौ. संस्कृती सातपुते यांनी केले.




जिल्हा परिषदेच्या शिवरत्न सभागृहामध्ये आयोजीत करण्यात आलेल्या समाजकल्याण समितीच्या बैठकीमध्ये समाजकल्याण सभापती सौ. संस्कृती सातपुते या बोलत होत्या. यावेळी समाजकल्याण समिती मधील सदस्य तथा जिल्हा परिषद सदस्य सौ. सुप्रिया गायकवाड, सौ. सिंधुताई आलदर, सौ. करुणा शिवशरण, सौ. सविता उंबरजे, कु. श्रुती भोरगुंडे, सौ. तेजस्वीनी बोराडे, सौ. शिवानी स्वामी, प्रशांत पाटील, नंदकुमार वाघमारे, प्रभारी जिल्हा समाज कल्याण अधिकारी प्रसाद मिरकले, समाजकल्याण विभागाच्या सहाय्यक आयुक्त सुलोचना सोनवणे यांच्यासह समाजकल्याण विभागातील जिल्हा व तालुका स्तरावरील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी प्रारंभी उपस्थित सर्व जिल्हा परिषद सदस्य यांचा समाजकल्याण सभापती सौ. संस्कृती सातपुते यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. सदर समाजकल्याण विभागाकडील विविध कार्यासन शिष्यवृत्ती , अनु. वस्तीगृह, जि प सेस. वृध्दाश्रम, अनु-जाती व नवबौध्द घटकांचा वस्त्यांचा विकास करणेबाबत सर्व योजनांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. याबाबत सदर सभेमध्ये सविस्तर चर्चा करण्यात आली.

समता सप्ताह साजरा करताना जिल्हा स्तरावर अत्यंत बारकाईने सुंदर नियोजन केल्याबदल. सभापती यांनी समाजकल्याण अधिकारी. प्रसाद मिरकले व विस्तार अधिकारी मनोज म्हेत्रे तसेच अधिक्षक सचिन सोनकांबळे व इतर कर्मचारी यांचे अभिनंदन केले. यावेळी समितीचे सदस्य सचिव तथा जिल्हा समाजकल्याण अधिकारी प्रसाद मिरकले यांनी विषयपत्रिकेवरील सर्व विषयांचा सविस्तर आढावा सभेपुढे दिला. योजना निहाय माहिती विस्तार अधिकारी श्री. मनोज म्हेत्रे व स्वाती गायकवाड यांनी दिली.

# कोलंबो येथे भारताचा झेंडा उंचावला – वागदरीची लेक श्रद्धा चव्हाणची दमदार कामगिरी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी(एस.के. गायकवाड .) :- तुळजापूर तालुक्यातील वागदरी येथील कन्या श्रद्धा बालाजीसिंग चव्हाण हिने आंतरराष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय यश संपादन करत संपूर्ण महाराष्ट्राचा अभिमान वाढवला आहे. महाराष्ट्र राज्य हँडबॉल असोसिएशनच्या वतीने २४ ते २६ एप्रिल २०२६ दरम्यान श्रीलंकेतील कोलंबो येथे आयोजित करण्यात आलेल्या साउथ एशियन अंडर-१७ बॉईज अँड गर्ल्स गोल शॉट बॉल चॅम्पियनशिप स्पर्धेत भारतीय संघाने विजेतेपद पटकावले, आणि या यशात श्रद्धाचा मोलाचा वाटा ठरला.




स्पर्धेदरम्यान भारतीय संघाने मालदीव, भूतान आणि नेपाळ या संघांवर दमदार विजय मिळवत अंतिम फेरीत प्रवेश केला. अंतिम सामन्यात भारताने यजमान श्रीलंका संघाचा १५-४ अशा मोठ्या फरकाने पराभव करत विजेतेपद आपल्या नावावर केले.

या अंतिम सामन्यात श्रद्धा चव्हाण हिने एकट्याने १५ पैकी तब्बल ६ गोल करत आपली खेळातील ताकद आणि कौशल्य सिद्ध केले. तिच्या या उत्कृष्ट कामगिरीमुळे संघाला भक्कम आघाडी मिळाली आणि विजयाचा मार्ग सुकर झाला.

श्रद्धा ही सध्या सोलापूर येथे पोलीस सेवेत कार्यरत असलेले बालाजीसिंग चव्हाण यांची कन्या आहे. वागदरी गावातील सामान्य कुटुंबातून आलेल्या श्रद्धाने आपल्या जिद्द, मेहनत आणि क्रीडाप्रेमाच्या जोरावर आंतरराष्ट्रीय स्तरावर यश मिळवले आहे.

तिच्या या यशामुळे वागदरीसह तुळजापूर तालुका आणि संपूर्ण सोलापूर जिल्ह्यात आनंदाचे वातावरण आहे. गावकऱ्यांकडून तिचे कौतुक होत असून, अनेकांनी तिच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

भारतीय संघाचे प्रतिनिधित्व करत देशाला विजेतेपद मिळवून देणाऱ्या श्रद्धा चव्हाण हिचे सर्वत्र अभिनंदन होत असून, तिच्या या यशामुळे भविष्यातील खेळाडूंना प्रेरणा मिळणार आहे.

# राष्ट्रध्वजासाठी प्लास्टिक वापरास सक्त मनाई; ध्वजसंहितेचे पालन करण्याचे आवाहन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : केंद्र शासनाच्या गृहमंत्रालयाने दिलेल्या निर्देशानुसार राष्ट्रध्वजाकरिता प्लॅस्टिकच्या वापरास व निर्मितीस सक्त मनाई आहे. भारतीय राष्ट्रध्वज संहितेचे काटेकोर पालन करावे. तसेच कोणत्याही परिस्थितीत प्लास्टीकचे राष्ट्रध्वज वापर व निर्मिती करण्यात येऊ नये असे आवाहन प्रांताधिकारी सचिन इथापे यांनी केले आहे.

राष्ट्रध्वजाविषयीचे प्रेम, निष्ठा, अभिमान दर्शविण्याकरिता विद्यार्थी नागरिकांकडूनदेखील राष्ट्रध्वजाचा वापर करण्यात येतो. कार्यक्रमानंतर राष्ट्रध्वज विविध सार्वजनिक ठिकाणी टाकले जातात. त्यामुळे राष्ट्रध्वजाचा अवमान होतो. रस्त्यात इतरत्र विखुरलेले राष्ट्रध्वज बरेच दिवस नष्ट होत नाहीत. राष्ट्रप्रतिष्ठेच्या दृष्टीने ही बाब गंभीर आहे.. राष्ट्रध्वजाचा अवमान करणे त्याची विटंबना होणे हे बोधचिन्ह व नावे (अनुचित वापरास प्रतिबंध) अधिनियम १९५० राष्ट्रीय प्रतिष्ठा अवमान प्रतिबंध अधिनियम १९७१ तसेच ध्वजसंहितेच्या तरतुदीनुसार दंडनीय अपराध आहे.

खराब झालेले, राष्ट्रध्वज आढळून आल्यास ते सन्मानपूर्वक गोळा करुन नजीकच्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या कार्यालयामध्ये जमा करावेत. तसेच नागरिकांनी ध्वज संहितेच काटेकोर पालन करावे असे आवाहनही प्रांताधिकारी सचिन इथापे यांनी केले आहे.

# सामाजिक न्याय व हक्कासाठी लढा देणारे अफजल कुरेशी यांना महात्मा फुले पुरस्कार घोषित

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

लातूर प्रतिनिधी/सुधाकर रणदिवे : महाराष्ट्र पोलीस मित्र सोशल असोसिएशन च्या वतीने प्रत्येक वर्षी दिला जाणारा अत्यंत सन्मानाचा राज्यस्तरीय पुरस्कार क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले समाजरत्न पुरस्कार लातूर येथील सामाजिक कार्यकर्ते अफजल भाई कुरेशी यांना देण्यात येणार असुन त्यानी केलेल्या सामाजिक राजकीय धार्मिक कार्याची दखल घेऊन हा पुरस्कार दिला जाणार आहे.अत्यंत गोर गरीब दुबळ्या लोकांचा कैवारी म्हणून परिचित असलेले अफजल कुरेशी यांचा सर्व स्तरातून कौतुक व स्वागत केले जात आहे.



# तीन दिवसांत दोन आघात; चांदोरीतील गायकवाड कुटुंबावर दुःखाचा डोंगर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड /प्रतिनिधी : नाशिक-संभाजीनगर महामार्गावर झालेल्या भीषण अपघातात चांदोरी येथील पीयूष प्रताप गायकवाड (वय १७) या तरुणाचा झालेला दुर्दैवी मृत्यू परिसरात हळहळ व्यक्त करणारा ठरला आहे. आयुष्याची अनेक स्वप्ने डोळ्यांत साठवून पुढे वाटचाल करणारा हा कोवळा जीव अकाली निघून गेल्याने सर्वत्र शोककळा पसरली आहे.





या दुःखद घटनेचा धक्का सहन न झाल्याने त्यांच्या आजी बब्याबाई माधवराव गायकवाड (वय ७०) यांचेही दुःखद निधन झाले. तीनच दिवसांत एकाच कुटुंबावर दोन मृत्यूंचा आघात झाल्याने गायकवाड कुटुंबीयांसह संपूर्ण चांदोरी गाव शोकसागरात बुडाले आहे.बब्याबाई गायकवाड या थोर तमाशा कलावंत व वगसम्राट स्व. माधवराव गायकवाड यांच्या धर्मपत्नी होत. त्यांच्या निधनामुळे सांस्कृतिक क्षेत्रातही मोठी पोकळी निर्माण झाली आहे. त्यांच्या कार्यामुळे आणि योगदानामुळे त्यांना समाजात मानाचे स्थान होते.या दुहेरी आघातामुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून, गायकवाड कुटुंबियांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. ईश्वराने दिवंगत आत्म्यांना शांती लाभो व कुटुंबियांना या कठीण प्रसंगातून सावरण्याची शक्ती देवो, अशी भावना सर्व स्तरांतून व्यक्त केली जात आहे

# एक मे पासून एसटीचे विशेष अभियान




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाने प्रवासी संख्या वाढावी व प्रवाशांना चांगल्या सुख सुविधा मिळाव्यात याकडे लक्ष केंद्रित केल्या असून एक मे पासून विशेष अभियान सुरू करण्यात येणार आहे.

। अभियाना अंतर्गत एसटी बस बस स्थानकावर येण्याअगोदर स्वच्छ व सुंदर दिसेल तसेच चालक आपली ओळख करून देईल यानंतर वाहक एस टी चा मार्ग सांगून एसटी किती वेळा त पोहोचणार आहे याची माहिती देणार आहे चालक व वाहक प्रवाशांची सौजन्याची वागणार आहेत.

एसटी व ग्राहक प्रवचनची सौजन्याने वागणार आहेत एसटी अचानक नादृष्ट झाल्यास तात्काळ दुसरी एसटी बस आणून प्रवाशांची सोय करण्यात येईल व प्रवाशांना जास्त वेळ ताटकळत उभे राहू नये यासाठी उपाययोजना करण्यात आली आहे ऑनलाइन सेवा देण्यासाठी स्मार्ट कार्ड प्रवाशांना देण्यात आले आहे एकंदरीत प्रवाशांना चांगला सुविधा देण्याकडे एसटी महामंडळाचे लक्ष केंद्रित केले असून प्रवाशांची संख्या वाढवण्याबरोबरच त्यांना चांगल्या सुविधा देणे याच्यावर भर देण्यात आल्याची दिसून येत आहे.

# बुद्ध पौर्णिमा निमित्य भगवान गौतम बुद्ध, महात्मा बसवेश्वर महाराज, छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यांची १ मे रोजी भव्य मिरवणूक



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : जय भारत माता सेवा समिती (रजि.) नवी दिल्लीचे राष्ट्रीय संस्थापक अध्यक्ष तथा राष्ट्रीय संत हवा मल्लिनाथ महाराज यांच्या प्रमुख उपस्थित सोलापुरात बुद्ध पौर्णिमा निमित्य भगवान गौतम बुद्ध, महात्मा बसवेश्वर महाराज,छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यांची विविध वाद्य समवेत देशभक्तीचा जयघोष करीत १ मे रोजी भव्य मिरवणूक काढण्यात येणार असल्यांची माहिती उद्योगपती सोमनाथ साखरे यांनी दिली.

देशासाठी महान कार्य केलेल्या सर्व राष्ट्रीय महापुरुष हे देशाचे अमूल्य रत्न आहेत. त्यांना त्यांच्या जातीसाठी सीमीत करू नये. त्यांना भारत देशाच्या उन्नतीसाठी प्रगतीसाठी वापरावे. फक्त एका जाती धर्मासाठी वापर करू नये. एकच जाती, एकच धर्मामुळे संविधान व निसर्ग वाचवता येत नाही. संविधान व निसर्ग वाचवण्यासाठी सर्व जाती-धर्माची लोक एकत्रित येऊन हम सब भारतीय है म्हणून देश भक्ती सेवा करणे काळाची गरज बनली आहे. या प्रमुख उद्देशाने राष्ट्रीय संत हवा मल्लिनाथ महाराज सोलापूर येथे या थोर महापुरुषांचे जयंती उत्सव साजरा करीत असल्यांची माहिती उद्योगपती अनिल पाटील यांनी दिली.

**देश वाचला तर सर्व जाती, धर्म, पक्ष, परिवार, आम्ही तुम्ही वाचतो. देश वाचला नाही तर कोणीही वाचणार नाही. राष्ट्रधर्म सर्वापेक्षा श्रेष्ठ आहे या विचाराने प्रेरित होऊन राष्ट्रीय संत हवा मल्लिनाथ महाराज देशात सर्वांगीण एकता मजबूत करण्यासाठी संविधानिक कर्तव्याची जाणीव देशातील प्रत्येक नागरिकांना करून देण्याचे प्रयत्न करीत आहे. जाती, धर्म, पक्ष, परिवाराची विचार न करता एक सन्याशी हवा मल्लिनाथ महाराज जय भारत माता सेवा समितीची स्थापना करून हातात तिरंगा झेंडा घेऊन सतत देशभर प्रवास करणारे हे दुर्मिळ राष्ट्रीय संत आहेत. ते देशभर अहोरात्र फिरून सशक्त देश व समाज घडविण्याचे कार्य करीत आहेत.**

**– डॉ. मृत्यूजय निलंगे सोलापूर**

शुक्रवार १ मे रोजी सकाळी साडे नऊ वाजता सोलापुरातील बस स्टॅन्ड जवळलील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या आश्वारुढ पुतळ्याला देशवासियांच्या वतीने राष्ट्रीय संत हवा मल्लिनाथ महाराज यांच्या शुभ हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात येणार असून सकाळी दहा वाजता पार्क चौकातील चार हुतात्मा पुतळा येथून देशभक्तीचा जयघोष करीत भव्य मिरवणूकिस सुरवात होणार आहे.यानंतर चार हुतात्मा व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यांना पुष्पहार अर्पण करून डफरिन चौक मार्गे, कामत हॉटेल चौक, व्हीआयपी रोड, संगमेश्वर कॉलेज, सात रस्ता चौक येथून मिरवणूक मार्गक्रमण करत गांधी नगर येथील हेरिटेज लॉन (फंक्शन हॉल) येथे कार्यक्रम स्थळी पोहचेल. यानंतर हेरिटेज लॉन येथे देशातील सर्व धर्मीय सर्व जातीय जनतेच्या प्रमुख उपस्थित देशभक्ती कार्यक्रम होणार आहे तरी या देशभक्ती कार्यक्रमाची सर्वांनी आवश्य लाभ घ्यावा असे आवाहन उद्योगपती हणमंत कावळे यांनी केले आहे. या पत्रकार परिषदेस जय भारत माता सेवा समितीचे सदस्य अजय शिंदे, अप्पासाहेब बिराजदार,बसवराज बिराजदार, मल्लिनाथ एंटमनी, महेश रगटे, अरुण बडदलकर, शंकर कस्तुरे, विजय पाटील, अनिल पाटील आदिजण उपस्थित होते.

**आपल्या देशाच्या स्वातंत्र्यासाठी, जनतेच्या कल्याणसाठी अनेक जाती धर्माचे हजारो वीर क्रांतिकारकानी स्वातंत्र्यापूर्वी बलिदान दिले आहे. तसेच सद्या भारत मातेच्या रक्षण करताना शहीद झालेल्या सर्व वीराना शतशः नमन करण्यासाठी भारतातील सर्व थोर महापुरुषांचे आणि शाहिद झालेल्या क्रांतिकारक स्वातंत्र्य सैनिकांच्या बलिदानांचा आदर करण्यासाठी आणि देशभक्ती वाढवण्याच्या उद्देशाने हा कार्यक्रम केला जात आहे.**

**– सुरेश म्हेत्रे वीट उत्पादक सोलापूर**

## महाराष्ट्राचे कृषीमंत्री मा ना दत्तात्रय भरणे यांच्या हस्ते करण्यात आला सन्मान

# डॉ. अभयकुमार बागडे यांना सर्वोत्कृष्ट कृषि संशोधन राज्यस्तरीय पुरस्कार प्रदान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नळदुर्ग/दादासाहेब बनसोडे : कोल्हापूर येथील राजर्षी छत्रपती शाहू महाराज शासकीय कृषि महाविद्यालयाच्या किटकशास्त्र विभागाचे प्रभारी प्रमुख व अखिल भारतीय समन्वयीत हुमणी वाळवी संशोधन प्रकल्पाचे प्रमुख संशोधक डॉ. अभयकुमार सदाशिवराव बागडे यांना त्यांच्या कृषी किटकशास्त्र विषयातील संशोधन योगदाना बद्दल तिफण फाउंडेशन मार्फत दिला जाणारा मानाचा 'ऍग्रीकल्चर रिसर्च एक्सलन्स पुरस्कार कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला




डॉ. अभयकुमार बागडे हे गेली सतरा वर्षे कृषि महाविद्यालयात सहयोगी प्राध्यापक म्हणून कार्यरत असून हुमणी किडीच्या नियंत्रणासाठी एकात्मिक कीड व्यवस्थापनाचे तंत्र शोधल्याबद्दल तसेच त्याचा सर्वदूर प्रसार करण्यासाठी त्यांनी केलेल्या प्रयत्नांची दखल घेत तिफण फाउंडेशनने यावर्षीच्या ह्या पुरस्कारासाठी निवड केली आहे. महाराष्ट्राच्या दक्षिण भागातील ऊस, सोयाबिन व भुईमूग या पिकांतील प्रमुख कीड असलेल्या व प्रामुख्याने ऊस उत्पादक शेतकऱ्यांची डोकेदुखी ठरलेल्या हुमणी किडीच्या यशस्वी नियंत्रणासाठी मेटारायझिम या जैविक बुरशीच्या वापरातून हुमणी नियंत्रणाचे तंत्र डॉ. अभयकुमार बागडे यांनी विकसित केले असून या बुरशीच्या सोईस्कर वापरासाठी मेटारायझीम ऍप्लिकेटर हे औजार शोधून काढले आहे तसेच विशेष कीटक सापळा संशोधित केला आहे ज्याला भारत सरकारद्वारे पेटंट मिळाले आहे. त्यासोबतच गोगलगाय नियंत्रणासाठी त्यांनी संशोधित केलेल्या स्नेल ट्रॅपलाही पेटंट मिळाले आहे.

कृषि विभागाद्वारे हुमणी नियंत्रणासाठी वाटप केल्या जाणाऱ्या मेटारायझीम च्या उत्पादनासाठी डॉ. बागडे यांच्या प्रयत्नातून महाविद्यालयात जिल्हा नियोजन व विकास समितीच्या अनुदानातून जैविक कीटकनाशक उत्पादन प्रयोगशाळा उभारण्यात आली असून तिचा भागातील शेतकऱ्यांना फायदा होत आहे.

विद्यार्थीप्रिय शिक्षक असलेल्या डॉ. बागडे यांना एक्सलन्स इन रिसर्च पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले आहेत

महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. शैलेंद्र कांबळे यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे. यासाठी उपविभागीय कृषी अधिकारी करवीर अरुण भिंगारदेवे आणि उपक्रोशी अधिकारी करवीर तथा तिफन फाउंडेशनचे राज्य समन्वयक श्री संतोष पाटील यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

या पुरस्कारामुळे महाविद्यालयातील प्राचार्य तथा प्राध्यापक शिक्षक पालकातुन कौतुकाचा अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# निफाड नगर पंचायत- जनगणना २०२७ साठी प्रगणक व पर्यवेक्षकांचे प्रशिक्षण संपन्न

## नगरपंचायत प्रशासनाकडून ६० कर्मचाऱ्यांची नियुक्ती; 'स्वगणना' प्रक्रियेवर दिला जाणार विशेष भर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : जनगणना २०२७ चा पहिला टप्पा घर यादी व घरगणना च्या पूर्वतयारीसाठी निफाड नगरपंचायत प्रशासनाच्या वतीने नियुक्त करण्यात आलेल्या प्रगणक व पर्यवेक्षकांचे विशेष प्रशिक्षण नुकतेच पार पडले.

**प्रगणक व पर्यवेक्षकांची फळी सज्ज**

निफाड नगरपंचायत क्षेत्रासाठी एकूण ५०प्रगणक (४३ मुख्य + ०७ राखीव) आणि १० पर्यवेक्षक (७ मुख्य + ३ राखीव) अशा एकूण ६० कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.यावर्षीच्या जनगणनेचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे नागरिकांना उपलब्ध करून देण्यात आलेली 'स्वगणना' (Self-Enumeration) ही सुलभ प्रक्रिया.

**स्वगणना'(Self-Enumeration) प्रक्रिया व माहिती**

यावेळेस प्रथमच नागरिकांना आपली माहिती स्वतः भरण्याची संधी देण्यात आली आहे. प्रशिक्षणादरम्यान प्रगणकांना या प्रक्रियेबद्दलही सविस्तर माहिती देण्यात आली.

नगरपंचायत कडून स्वतंत्र स्वगणना मदत कक्ष स्थापन केला असून नागरिकांच्या मदतीसाठी आणि माहिती देण्यासाठी स्वतंत्र कर्मचारी नियुक्त करण्यात येणार आहे.




> **स्वगणनेमुळे जनगणनेचे काम अधिक वेगवान आणि डिजिटल होणार आहे. नागरिकांनी या प्रक्रियेत सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात येत आहे.**
>
> **– धिरज भामरे, चार्ज अधिकारी तथा मुख्याधिकारी, निफाड नगरपंचायत**

**प्रक्रिया:** नागरिक जनगणनेच्या अधिकृत पोर्टलवर जाऊन स्वतः च्या मोबाईल क्रमांकाद्वारे नोंदणी करू शकतील. नोंदणीनंतर त्यांना एक 'ठशषशीशपलश खऊ' मिळेल.

**प्रगणकाची भूमिका:** जेव्हा प्रगणक संबंधित कुटुंबाच्या घरी भेटी देतील, तेव्हा नागरिकांनी केवळ तो 'ठशषशी-शपलश खऊ' त्यांना दाखवायचा आहे. यामुळे प्रगणकांना पुन्हा सर्व माहिती भरण्याची गरज उरणार नाही.

**कालावधी:** जनगणनेच्या प्रत्यक्ष क्षेत्रीय कामाला सुरुवात होण्यापूर्वी दि. ०१ मे २०२६ ते दि. १५ मे २०२६ या कालावधीसाठी स्वगणनेची https://se.census.gov.in ही विडो (Link) खुली केली जाणार आहे.

फायदा: यामुळे नागरिकांच्या वेळेची बचत होईल आणि गोपनीय माहिती अधिक अचूकपणे पोर्टलवर जतन केली जाईल.

स्वगणना कालावधी संपल्यानंतर दि.१६ मे २०२६ ते दि.१४ जून २०२६ या कालावधीत प्रगनकांद्वारे घरोघरी जाऊन घरगणना व अनुषंगिक कार्यवाही करण्यात येणार आहे.

**प्रशिक्षणातील प्रमुख मुद्दे**

प्रशिक्षण वर्गात प्रगणकांना व पर्यवेक्षक यांना डिजिटल पचा वापर, डेटा संकलन आणि क्षेत्रीय कामकाजाचे नियोजन याबद्दल मार्गदर्शन करण्यात आले. प्रशिक्षणाच्या सुरुवातीला सर्व कर्मचाऱ्यांना गोपनीयता जपण्याबाबतची शपथ देण्यात आली.

### प्रशिक्षणास गैरहजर राहणाऱ्यांवर होणार कारवाई

**प्रशिक्षण वर्गास सर्व प्रगणक व पर्यवेक्षकांची उपस्थिती अनिवार्य करण्यात आली होती. जे कर्मचारी प्रशिक्षणास किंवा जनगणनेच्या कामात विनापरवाना गैरहजर राहतील, त्यांच्यावर जनगणना अधिनियम, १९४८ च्या कलम ११ अन्वये तातडीने प्रशासकीय कारवाई व नोटीस बजावण्यात येणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.**

# मोबदला किती देणार आहे हे अगोदर सांगा: बाधित नागरिकांनी केला प्रश्न उपस्थित




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपुरात येणाऱ्या भाविकांना चांगल्या सुविधा मिळावा यासाठी शासनाने कॉरिडोर करण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे मंदिर परिसरातील घरे दुकाने बाधित होणार आहेत. बाधित होणाऱ्या नागरिकांना किती मोबदला देणार ह्या अगोदर सांगा आणि मगच कॉरिडोर विषयी चर्चा करा अशी नागरिकांनी विचारले आहे.

सोलापूर येथील कार्यक्रमात वर्षाखेरीज कोर्टाचे काम सुरू करण्यात येणार आहे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली, मात्र कॉरिडोर विषयी नागरिकांना कोणतीही माहिती दिली जात नाही. माहिती द्यावी व काम कशा पद्धतीने करण्यात येणार आहे. याची माहिती व्हावी म्हणून कॉरिडॉर समिती स्थापन करावी अशी मागणी पंढरपूर तीर्थक्षेत्र बचाव समितीने केली आहे.

पंढरपूर तीर्थक्षेत्र बचाव समितीच्या वतीने हिंदू सभा येथे पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी समितीचे अध्यक्ष अभयसिंह कुलकर्णी तिसगावकर व पदाधिकारी शासनाने कॉर्टर ची माहिती नागरिकांना द्यावी नागरिकांना विश्वासात घेण्यासाठी पंढरपूर कॉर्डर समिती स्थापन करण्यात आली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व पालकमंत्री जयकुमार गोरे आमदार समाधान आवताडे माजी आमदार प्रशांत परिचारक हे नागरिकांना विश्वासात घेऊन कॉरिडॉर करण्याची सांगत आहे. नागरिकांना विश्वासात न घेता कोणतीही माहिती न देता कॉरिडॉर करण्याचे काम सुरू झाले आहे. शासनाकडून नागरिकांना योग्य मोबदला देण्यात येईल. असे सांगितले जात आहे पण मोबाईलची माहिती दिली जात नाही. ऑर्डर झाल्यानंतर अर्थकारणात गती मिळणार असल्याचे उटी अतिक्रमण वाढणार आहे व मोठ्या प्रमाणावर बाहेर जाऊन व्यापारी येऊन धोका निर्माण होणार असल्याचे बोलले जात आहे.

कॉरिडॉर बाबत तीन हजार हरकती व सूचना दाखल झाले आहेत. याची कोणतीही दखल शासनाने घेतली नसल्याची दिसून येत आहे. एकंदरीत शासनाने कॉरिडर करण्याचा निर्णय घेतला असून. कॉर्डोर समितीवर अन्याय होत असल्याचे अनेक पदाधिकाऱ्यांनी आपले मत मांडले आहे.

# स्वेरीमध्ये येत्या शनिवारी अटल कम्युनिटी इनोव्हेशन सेंटर–स्वेरीचे भव्य उदघाटन




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : गोपाळपूर (ता.पंढरपूर) येथील श्री विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूट मध्ये येत्या शनिवार, दि. ०२ मे २०२६ रोजी सकाळी ०९.३० वाजता विख्यात अणुशास्त्रज्ञ तथा भारतीय अणुऊर्जा आयोगाचे माजी अध्यक्ष पद्मभूषण डॉ. अनिल काकोडकर यांच्या हस्ते अटल कम्युनिटी इनोव्हेशन सेंटर–स्वेरी (ए.सी.आय.सी.–स्वेरी) चे उदघाटन होणार असून या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पंढरपूर–मंगळवेढा विधानसभेचे आमदार समाधान आवताडे हे राहणार आहेत तर प्रमुख पाहुणे म्हणून माढा विधानसभा मतदार संघाचे आमदार अभिजीत पाटील, विधानपरिषदेचे माजी सदस्य प्रशांत परिचारक, मोहोळ विधानसभा मतदार संघाचे आमदार राजू खरे आणि सांगोला विधानसभा मतदारसंघाचे आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमासाठी सोलापूर जिल्ह्याचे जिल्हाधिकारी कार्तिकेयन

> **विख्यात अणूशास्त्रज्ञ पद्मविभूषण डॉ. अनिल काकोडकर यांच्या हस्ते होणार उदघाटन**

एस., जिल्हा पोलीस अधीक्षक (ग्रामीण) अतुल कुलकर्णी, सोलापूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन, पंढरपूर विभागाचे पोलीस उपअधीक्षक प्रशांत डगळे, पंढरपूरचे उपविभागीय अधिकारी सचिन इथापे, पंढरपूरचे तहसीलदार सचिन लंगोटे, पंढरपूर नगरपालिकेचे मुख्याधिकारी महेश रोकडे, पंढरपूर तालुका पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक तय्यब मुजावर, वरिष्ठ पोलीस निरीक्षक दशरथ वाघमोडे, पंढरपूरच्या पोलीस निरीक्षक सौ. रेखा घनवट यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. यापूर्वी दि. ०९ डिसेंबर २०२५ रोजी अटल कम्युनिटी इनोव्हेशन सेंटरच्या स्थापनेसाठी नीती आयोगाबरोबर सामंजस्य करार करण्यात आला होता. हे केंद्र हे विशेषतः ग्रामीण भागातील उद्योजकता आणि रोजगार निर्मिती साठी प्रोत्साहन देण्याचे कार्य करणार आहे. स्वेरीचे संस्थापक व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ.बी.पी. रोंगे, संस्थेचे अध्यक्ष अशोक भोसले, उपाध्यक्ष सुरेश राऊत सचिव डॉ. सुरज रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच सोबस इनसाइट फोरमचे मुख्य कार्यकारी अधिकारी दिग्विजय चौधरी व अटल कम्युनिटी इनोव्हेशन सेंटर- स्वेरीचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष भूतडा यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व तयारी पूर्ण झाली असून यासाठी सर्वांनी उपस्थित राहावे, असे आवाहन संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे.

# वागदरी येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती उत्सवाची भव्य मिरवणुकीने सांगता





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी/एस. के.गायकवाड : तुळजापूर तालुक्यातील मौजे वागदरी येथे भारतीय घटनेचे शिल्पकार परमपूज्य बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंती निमित्ताने आयोजित डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सवाची सांगता अखेर भव्य मिरवणुकीने करण्यात आली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ जयंती निमित्ताने भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव कमिटी वागदरी ता.तुळजापूर च्या वतीने दोन दिवशीय जयंती उत्सवाचे आयोजन करण्यात आले होते.

दि.२७ एप्रिल २२६ रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्ताने जागर महामानवाच्या विचारांचा या सदरा खाली व्याख्यान,मान्यवरांचा सत्कार शालेय विद्यार्थ्यांची भाषणे व भिम गीत गायन आदी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी येथील सेवानिवृत्त पोलीस हवालदार संदीपान वाघमारे हे होते.तर प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा परिषद धाराशिव चे अर्थ व बांधकाम सभापती सिद्धेश्वर अण्णा कोरे, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते शिवाजी मिटकर गुरुजी,पंचायत समिती सदस्य भिवाजी इंगोले,नळदुर्ग नगर परिषदेचे नगर सेवक तथा विरोधी पक्ष गट नेते मारुती खारवे,रिपाइं (आठवले) चे जिल्हा उपाध्यक्ष बाबासाहेब बनसोडे, समता .सैनिक दलाले मल्लिनाथ लोंढे आधी उपस्थित होते. प्रारंभी तथागत भगवान गौतम बुद्ध व महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांचे उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पुजन करून कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. याप्रसंगी भिवाजी इंगोले, मारुती खारवे, बाबासाहेब बनसोडे,मल्लिनाथ लोंढे आदींची मार्गदर्शनपर भाषणे झाली. तर आम्रपाली गायन पार्टी मौज किलज, पंचशील गायन पार्टी वागदरी यांचा भीम गीत गायनाचा जंगी कार्यक्रम संपन्न झाला.

तर दि.२८ एप्रिल २२६ महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेची गावातून सहवाद्य भव्य मिरवणूक काढून या जयंती उत्सवाची सांगता करण्यात आली.यावेळी अमरदीप लेझीम संघ नळदुर्ग व बी,आर.लेझीम संघ वागदरी यांनी उत्कृष्ट लेझीम पथकाचे सादरीकरण करून प्रेक्षकांची म्हणजे जिंकली.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी जयंती उत्सव कमिटीचे अध्यक्ष महादेव वाघमारे,सचिव चंद्रकांत वाघमारे,उपाध्यक्ष दीपक वाघमारे,सदस्य एस.के. गायकवाड,राजकुमार वाघमारेआदी सह जेष्ठ व युवा कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

या सर्व कार्यक्रमाचे सूत्रसंचलन रिपाइं (आठवले) चे जिल्हा सचिव तथा पत्रकार एस. के. गायकवाड यांनी केले.

यावेळी भालचंद्र यादव, मदन पाटील, किशोर धुमाळ, अमोल पवार, किशोर सुरवसे, जितेंद्र पाटील सह ग्रामस्थ महिला युवा कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**सरपंच पतीकडून अधिकाऱ्यांसमोरच अश्लील शिवीगाळ; चिखली पंचायत समितीसमोर ५ मे पासून उपोषणाचा इशारा**

# मंगरूळमध्ये पाण्यासाठी वणवण; ६७ लाखांची पाणी योजना कागदावरच!


**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

राहुल साबळे / बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी : चिखली तालुक्यातील मौजे मंगरूळ (इ) येथे गेल्या दोन वर्षांपासून भीषण पाणीटंचाई निर्माण झाली असून, ग्रामपंचायतीच्या अजब कारभारामुळे ग्रामस्थांना पाण्यासाठी दाहीदिशा भटकंती करावी लागत आहे. शासनाने मंजूर केलेल्या ६७ लाखांच्या पाणीपुरवठा योजनेचा बोजवारा उडाला असून, याप्रश्नी जाब विचारणाऱ्यांना आता सत्ताधाऱ्यांच्या अरेरावीचा सामना करावा लागत असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे.मंगरूळ ( इ) गावासाठी २०२१ मध्ये ६७ लाख रुपये खर्चाची पाईपलाईन, विहीर आणि वीज कनेक्शनची योजना मंजूर झाली होती. या योजनेचे काम पूर्ण झाल्याचे भासविले जात असले तरी, नियोजनाच्या अभावामुळे ग्रामस्थांना थेंबभर पाणीही मिळालेले नाही. पाईपलाईन बुडीत क्षेत्रातून टाकल्यामुळे ती वारंवार लीक होते, परिणामी लाखो रुपये खर्चूनही ही योजना निरुपयोगी ठरली आहे. स्थानिक लोकप्रतिनिधी आणि ग्राम पंचायत प्रशासनाच्या हलगर्जीपणामुळेच ही स्थिती ओढवल्याचा आरोप ग्रामस्थ करत आहेत.

या पाणीटंचाईच्या निषेधार्थ ग्रामस्थांनी ३० एप्रिल रोजी मोर्चा काढण्याचे निवेदन दिले होते. यावर तोडगा काढण्यासाठी २८ एप्रिल २०२६ रोजी अंढेरा पोलीस स्टेशनचे निरीक्षक रुपेश शक्करगे यांनी एक बैठक आयोजित केली होती. या बैठकीत ग्राम सहाय्यक अधिकारी शिंदे मॅडम, पोलीस पाटील गवते मॅडम आणि तंटामुक्ती अध्यक्ष उपस्थित होते.

चर्चा सुरू असतानाच, संतापजनक बाब म्हणजे सरपंच पती यांनी सर्व अधिकाऱ्यांसमोर अश्लील भाषेत शिवीगाळ केली. या संपूर्ण प्रकाराचे व्हिडिओ रेकॉर्डिंग झाले असून, कोणीही प्रशासनाला प्रश्न विचारू नये अशा आविर्भावात ही अरेरावी करण्यात आली. महिला अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत झालेल्या या प्रकारामुळे परिसरात संताप व्यक्त होत आहे.ग्रामपंचायतीचा हा भ्रष्टाचार आणि पाण्याचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी चिखली पंचायत समितीचे गटविकास अधिकारी समाधान वाघ यांनी तातडीने लक्ष देण्याची मागणी ग्रामस्थांनी केली आहे. प्रशासनाने या प्रकरणाची गांभीर्याने दखल न घेतल्यास, तक्रारकर्ते आणि त्रस्त ग्रामस्थ ५ मे २०२६ पासून पंचायत समिती कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू करणार आहेत.

शासनाचा पैसा पाण्यात गेला असून दोषींवर कठोर कारवाई व्हावी आणि मंगरूळवासीयांची तहान भागवावी, अन्यथा आंदोलनाशिवाय



पर्याय नाही, असा पवित्रा आंदोलकांनी घेतला आहे.

# बापगाव येथील सिद्धिविनायक संकुलात डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात साजरी



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/ मिलिंद जाधव : बापगाव येथील सिद्धिविनायक संकुलाच्या वतीने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती मोठ्या उत्साहात आणि दिमाखात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमात विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती लाभली आणि सामाजिक, शैक्षणिक तसेच वैचारिक वातावरणात जयंती सोहळा पार पडला.

या प्रसंगी नांदकर येथील माजी उपसरपंच राजेंद्र गायकवाड, माजी उपसरपंच उषा कदम, सामाजिक कार्यकर्ते सुभाष जाधव, प्रताप बोदडे, जीवनदास गायकवाड, किशोर गायकवाड, कल्पेश गायकवाड आदी प्रमुख मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमात पालीभाषेचे अभ्यासक सुभाष जाधव यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनातील विविध टप्प्यांवर सखोल मार्गदर्शन केले. त्यांनी 'भिवा', 'भिमराव', 'डॉ. आंबेडकर', 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर' आणि 'बोधिसत्त्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर' या पाच टप्प्यांद्वारे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा प्रवास उलगडून सांगितला. तसेच त्यांनी संविधानातील स्त्रियांसाठी असलेली कलमे १४, १५(१), १५(२), १६(१), ३९ तसेच हिंदू कोड बिल आणि रमाई यांच्या योगदानावरही प्रकाश टाकला.

यावेळी धर्मेंद्र वाल्मिकी यांच्या हस्ते प्रमुख पाहुण्यांना 'मुक्ती कोण पथे' हे पुस्तक भेट देण्यात आले. तसेच एस.एस. बेकर्सचे डायरेक्टर महेश केणे यांच्या वतीने केक वाटप करून आनंदोत्सव साजरा करण्यात आला. कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी वक्तृत्व आणि नृत्य स्पर्धांमध्ये उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. सहभागी विद्यार्थ्यांना बापगाव सावित्रीबाई फुले बचत गटाच्या अध्यक्षा स्वाती रुपेश जाधव यांच्या हस्ते शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रूपेश जाधव यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी राहुल रंधवे, रुपेश जाधव, योगेश सूर्यवंशी, स्वप्नील साबळे, दौलत धनगर, दीपक माघाडे, आकाश मोरे, दिनेश ताम्हणकर, मनोज खिल्लारी, रवि जाधव, धर्मेंद्र वाल्मिकी, बळीराम कुटे, प्रवीण वामनाचार्य, शाहीर काळे आणि वाल्मीक धीवर यांनी विशेष परिश्रम घेतले. या जयंती सोहळ्याद्वारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचे स्मरण करून सामाजिक समता, शिक्षण आणि प्रगतीचा संदेश प्रभावीपणे देण्यात आला.